
# अजून तरी

## स्वाध्याय


**अ. आकलन**

**क.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. प्रकाश २. थोडी मोकळी हवा


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. समोरचे मोकळे मैदान

२. खांद्यांच्या उंचीचे सिमेंटचे खांब


कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. लॉरीमधून दगड खाली घसरणे.

२. जमिनीत घुसणारे बोअर मशीन.

कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. समोरचा रस्ता

२. देवळातल्या घंटेचा आवाज

३. मशिदीची पहाटेची अजान

कृ.५. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाची लांबी-रुंदी

२. खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यातील गर्दी

कृ.६. चौकट पूर्ण करा.

| | | |
|---|---|---|
| १. | मोकळे मैदान याच्या आधाराने उभे आहे | → |
| २. | पहाटेच्या नीरव शांततेत हे ऐकू येते | → |

उत्तर: १. सळसळणाऱ्या झाडांच्या

२. मशिदीमधील अजान

कृ.७. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.

१. ________ यांच्या लेखणीतून 'अजून तरी' ही कविता साकारली आहे.

(रफिक सिराज / रफिक चाँद / रफिक सूरज / तौसिफ सूरज)

२. 'अजून तरी' ही कविता '________' या काव्यसंग्रहातील आहे.

(सोंग काढून हा पोर / सोंग घेऊन हा पोर / सोंग करून हा पोर / ढोंग करून हा पोर)

३. खेळणाऱ्या मुलांचा ________ ऐकू येत नाही.

(आवाज / गलबला / पायरव / गोंगाट)

४. समोरचे मोकळे मैदान हळूहळू ________ होत गेलंय हे खरंय.

(विस्तीर्ण / संकुचित / विस्तारीत / कमी-कमी)

**उत्तर:** १. रफिक सूरज    २. सोंग घेऊन हा पोर
३. गलबला    ४. संकुचित

**कृ.८. खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. जमिनीत पुरलेल्या सिमेंटच्या खांबांना ________
अ. काटेरी तारा जोडलेल्या आहेत.
ब. काटेरी तारा गुंडाळलेल्या आहेत.
क. काटेरी निवडुंग गुंडाळलेले आहेत.
ड. रेतीचे लेपन केले आहे.

२. आता खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यात ________
अ. कुणाची दाटी नको आहे.
ब. कशाची कमतरता नको आहे.
क. कशाची वर्दळ नको आहे.
ड. कुणाची अधिक गर्दी नको आहे.

**उत्तर:** १. जमिनीत पुरलेल्या सिमेंटच्या खांबांना **काटेरी तारा गुंडाळलेल्या आहेत.**
२. आता खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यात **कुणाची अधिक गर्दी नको आहे.**

**कृ.९. सत्य विधान शोधून लिहा.**

अजून तरी लेखकाला खिडकीतून हे दिसते –

अ. चौकोनी आकाश, थोडा प्रकाश, थोडी मोकळी हवा

ब. हिरवागार निसर्ग

क. निळाशार समुद्र

ड. घनदाट जंगल

**उत्तर:** चौकोनी आकाश, थोडा प्रकाश, थोडी मोकळी हवा

**कृ.१०.असत्य विधान शोधून लिहा.**

कधीकधी कवीला आवाज ऐकू येतात –

अ. लॉरीमधून दगड खाली घसरण्याचे

ब. जमिनीत घुसणाऱ्या बोअर मशीनचे

क. कवीच्या मनाचे

ड. देवळातील घंटा व मशिदीची अजान यांचे

**उत्तर:** कवीच्या मनाचे

## कृ.११.कवितेवर आधारित प्रश्न

**१. 'समोरचे मोकळे मैदान हळूहळू संकुचित होत गेलंय हे खरंच' या काव्यपंक्तीचा आशय स्पष्ट करा.**

**उत्तर:** प्रस्तुत काव्यपंक्ती रफिक सूरज यांच्या 'अजून तरी' या कवितेतील आहे. शहरीकरणामुळे ग्रामीण भागही झपाट्याने बदलत आहेत; पण असे असले, तरी काही मूल्यं गावाने अजूनही टिकवून ठेवली आहेत. बदलत्या गावाबद्दल खंत व्यक्त करताना कवी म्हणतो, माझ्या खिडकीतून अजून तरी प्रकाश, थोडी मोकळी हवा येते. सळसळणाऱ्या झाडांच्या आधाराने उभे थोडे मोकळे मैदानही दिसते; पण त्यासोबत दिवसेंदिवस हे मैदान संकुचित होत असल्याची जाणीवही कवीला आहे. ग्रामीण माणसांच्या वृत्तीतला मोकळेपणा जाऊन त्यांची वृत्ती संकुचित होत आहे. याबद्दलची खंत कवीने व्यक्त केली आहे.

**२. 'खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यांत अधिक नकोय आता कुणाची गर्दी.' या काव्यपंक्तीतून लेखकाला काय सुचवायचे आहे?**

**उत्तर:** कवी रफिक सूरज यांच्या 'अजून तरी' या कवितेतील या शेवटच्या पंक्तीतून कवी, शहरीकरणाच्या रेट्यात आपल्या खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यात तरी आणखी बदल व्हायला नको अशी आशा व्यक्त करतात. शहरीकरणामुळे खिडकीसमोरचे मैदान संकुचित झाले आहे, त्यामुळे खेळणाऱ्या मुलांचा गलबला ऐकू येत नाही,

जमिनीत पुरलेले सिमेंटचे खांब आणि त्यावर तारा गुंडाळून प्लॉटच्या निशाण्या पाडलेल्या दिसतात. लॉरीमधून घसरणारे दगड आणि जमिनीत घुसणाऱ्या बोअर मशीनचा आवाज एकू येतो; पण तरी दुसऱ्या बाजूला समोरचा रस्ता शाबूत आहे. देवळातला घंटानाद, मशिदीची अजान हे ऐकू येतंच. त्यामुळे आता किमान उरलेल्या या गोष्टी तरी टिकून राहाव्यात. अधिकच्या गोष्टींची भर पडून खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाची लांबी-रुंदी कमी व्हायला नको अशी आशा कवी व्यक्त करतात.

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. [ ] : बंदिस्त : : अंधार : प्रकाश

२. [ ] : पटांगण : : जमीन : भूमी

**उत्तर:** १. मोकळी २. मैदान

### कृ.२. खालील शब्दांना कवितेतील पर्यायी शब्द लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| शिल्लक | खूण | मंदिर | खडक |
| १ | २ | ३ | ४ |
| मार्ग | गोंगाट | आखूड | गगन |
| ५ | ६ | ७ | ८ |

**उत्तर:** १. शाबूत २. निशाणी
३. देऊळ ४. दगड
५. रस्ता ६. गलबला
७. संकुचित ८. आकाश

### कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.

१. दगड, चुना, सिमेंट, नीरव

२. प्रकाश, तारा, आकाश, झाडे

**उत्तर:** १. नीरव २. तारा

### कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.




**उत्तर:** १. प्लॉट २. सिमेंट
३. लॉरी ४. बोअर मशीन
५. अजान

**कृ.५. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

नमाज पढण्याकरिता बोलावणे : [ ]

**उत्तर:** अजान

**कृ.६. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. प्रकाश : [ ] [ ]

२. हवा : [ ] [ ]

**उत्तर:** १. प्रकाशमान, प्रकाशसंश्लेषण

२. हवामान, हवाबंद

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. कवितेच्या आधारे विशेषणे व विशेष्ये यांच्या जोड्या जुळवा.**

| | विशेषणे | | विशेष्ये |
|---|---|---|---|
| १ | मोकळी | अ. | आकाश |
| २. | नीरव | ब. | हवा |
| ३. | चौकोनी | क. | मैदान |
| ४. | काटेरी | ड. | शांतता |
| ५. | मोकळे | इ. | तारा |

**उत्तर:** (१ - ब), (२ - ड), (३ - अ), (४ - इ), (५ - क)

कृ.२. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | आधाराने | | |
| २. | जमिनीत | | |
| ३. | सिमेंटचे | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | आधाराने | ने | तृतीया |
| २. | जमिनीत | त | सप्तमी |
| ३. | सिमेंटचे | चे | षष्ठी |

कृ.३. खालील शब्दांचे कवितेतील सामान्यरूप शोधून लिहा.

१. पहाट २. आकाश

३. दृश्य ४. मुले

उत्तर: १. पहाटे २. आकाशा

३. दृश्यां ४. मुलां

**कृ.४. कवितेतील दोन शब्दयोगी अव्यये व दोन उभयान्वयी अव्यये शोधून लिहा.**

**उत्तर:** उभयान्वयी अव्यये – आणि, किंवा

शब्दयोगी अव्यये – सारखा, मधून

**कृ.५. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. चौकोन  २. जागोजागी

३. नीरव

**उत्तर:**

| | **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समास** |
|---|---|---|---|
| १. | चौकोन | चार कोनांचा समूह | द्विगू समास |
| २. | जागोजागी | प्रत्येक जागी | अव्ययीभाव समास |
| ३. | नीरव | आवाज (रव) नसलेले | अव्ययीभाव समास |

**कृ.६. कवितेतील 'चेतनगुणोक्ती' अलंकाराचे उदाहरण शोधून लिहा व त्याचे स्पष्टीकरण द्या.**

**उत्तर:** 'समोरचे मोकळे मैदान हळूहळू संकुचित होत गेलंय' या काव्यपंक्तीत चेतनगुणोक्ती अलंकार आहे.

निर्जीव वस्तू सजीव आहे अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागते असे येथे वर्णन आहे. मैदान या निर्जीव गोष्टीला संकुचित होणे हे सजीवाचे वैशिष्ट्य जोडले आहे.

**कृ.७. 'अजून तरी' ही कविता या छंदातली आहे.**

अ. ओवी    ब. मुक्तछंद

क. अभंग

**उत्तर:** ब. मुक्तछंद

**कृ.८. खालील कोष्टक पूर्ण करा.**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १. | खिडकी | |
| २. | झाड | |
| ३. | | जमिनी |
| ४. | | घंटा |

**उत्तर:**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १. | खिडकी | **खिडक्या** |
| २. | झाड | **झाडे** |
| ३. | **जमीन** | जमिनी |
| ४. | **घंटा** | घंटा |

**कृ.९. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. खांद्याऐवडाले २. मशीदिची

३. द्रुष्यांत

**उत्तर:** १. खांद्याएवढाले २. मशिदीची

३. दृश्यांत

**ड. माझे मत**

**कृ.१.'अजून तरी' या कवितेचे तुम्हाला जाणवलेले वैशिष्ट्य लिहा.**

**उत्तर:** कवी रफिक सूरज यांच्या 'अजून तरी' या कवितेतून त्यांनी शहरीकरणामुळे गावांच्या बदलत्या चेहऱ्याचे वर्णन केले आहे व त्याबद्दलची आपल्या मनातील खंतही मांडली आहे. हे सर्व मांडताना त्यांनी आपल्या खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यांचा आधार घेतला आहे हे या कवितेचे वैशिष्ट्य. कवीच्या खिडकीतून आताही प्रकाश व मोकळी हवा येते. चौकोनी आकाश आणि झाडांच्या आधाराने उभे असलेले मैदान दिसते; पण हे मैदान संकुचित झालं आहे; त्यामुळे येथे खेळणाऱ्या मुलांचे आवाज नाहीसे झाले आहेत. त्याऐवजी सर्वत्र प्लॉट पाडल्याच्या निशाण्या म्हणून तारा गुंडाळलेले सिमेंटचे खांब दिसत आहेत व लॉरीतून दगड घसरण्याचे, बोअर मशीनचे आवाज येतात. या सर्व बदलांनी कवी अस्वस्थ आहेत. म्हणूनच ते, समोरचा रस्ता, देवळातला घंटानाद आणि मशिदीची अजान या आजही टिकून राहिलेल्या गोष्टी गमवायला मुळीच तयार नाहीत. त्यांना आता आकाशाच्या लांबी-रुंदीत अजिबात फरक नकोय, खिडकीतल्या दृश्यांत आणखी गर्दी नकोय. गावाचं गावपण हरवत चालल्याची भावना या कवितेत जागोजागी प्रत्ययास येते. अत्यंत साध्या-सोप्या, पण वर्णनात्मक शैलीतली ही कविता कवीची अस्वस्थता वाचकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवते.

**कृ.२. 'शहरीकरणाचे फायदे व तोटे' याबद्दल तुमचे मत मांडा.**

**उत्तर:** शहरीकरण ही देशाच्या विकासासाठी आवश्यक अशी प्रक्रिया आहे. शहरीकरणाचे काही फायदे आहेत, तसेच काही तोटेही आहेत. शहरीकरणामुळे गावे एकमेकांशी विविध वाहतूकमार्गांनी जोडली जातात. त्यामुळे दळणवळण सुधारते व तेथे राहणाऱ्या लोकांची संपर्ककक्षा रुंदावते, पर्यायाने अनुभवक्षेत्र व्यापक होते. तंत्रज्ञान, अर्थकारण, रोजगार या सर्वच बाबींमध्ये शहरीकरण झालेली गावे प्रगती करू लागतात; पण त्याच वेळेस गावांचा मोकळेपणा मात्र कमी होतो. गावाचा निसर्ग, प्रसन्न करणारी शांतता, निवांत जनजीवन यांना शहरीकरणामुळे वेगावर आरूढ व्हावं लागतं. त्यामुळे गावातील लोकांचा मूळचा उदारपणा कमी होऊन आत्मकेंद्री वृत्ती वाढीस लागते. धूळमातीचे; पण आपलेसे वाटणारे रस्ते, टुमदार घरे, मोकळी, प्रशस्त आवारे, आणि माणसांमाणसांतील जिव्हाळा यांना शहरीकरणामुळे धक्का पोहोचतो.